नामसंकीर्तनयोग : खंड ३

# नामजप कोणता करावा ?

## (साधनेच्या प्राथमिक ते पुढील अवस्थांत करायचे जप)

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**आणि पू. संदीप गजानन आळशी**



**सनातन संस्था**



**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४५, इंग्रजी २०१, कन्नड १९९, हिंदी १९६, गुजराती ६८, तेलुगु ५४, तमिळ ४४, बंगाली ३०, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**ऑगस्ट २०२४ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९७ लाख ३३ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून २०.९.२०२४ पर्यंत १२८ साधक संत झाले, तर १,०४३ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. देवता, साधना, राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्वनिष्ठ नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्‌घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्वनिष्ठ आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन !

७. भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रसारार्थ ‘भारत गौरव पुरस्कार’ देऊन फ्रान्सच्या संसदेत सन्मान (५ जून २०२४)

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !**

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वा ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥ – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## अनुक्रमणिका

**(प्रकरणांतील काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


| | | |
|---|---|---|
| **प्रकरण १.** | **जिज्ञासूंसाठी उपयुक्त २ नामजप** | ९ |
| १ अ. | अतृप्त पूर्वजांच्या त्रासांपासून रक्षण होण्यासाठी दत्ताचा नामजप | ९ |
| १ आ. | आध्यात्मिक उन्नतीसाठी करायचा नामजप | ११ |
| १ इ. | काही नामजपांविषयी तुलनात्मक विवेचन | १७ |
| १ ई. | नामजप करतांना मुद्रा आणि न्यास करण्याचे महत्त्व | २० |
| **प्रकरण २.** | **वाईट शक्तींच्या त्रासांचे निवारण करण्यासाठी नामजप** | २२ |
| २ अ. | वाईट शक्ती म्हणजे काय ? | २२ |
| २ आ. | वाईट शक्तींचे त्रास दूर करण्याची आवश्यकता | २२ |
| २ इ. | वाईट शक्तींच्या त्रासांची काही लक्षणे | २२ |
| २ ई. | वाईट शक्तींच्या त्रासांच्या निवारणासाठी करायचा नामजप | २३ |
| २ उ. | वाईट शक्तींच्या त्रासांच्या निवारणासाठी नामजपाच्या जोडीलाच स्वभावदोष अन् अहं यांचे निर्मूलन करणे | २४ |

**प्रकरण ३. साधनेच्या प्राथमिक अवस्थेत असलेल्यांनी करायचे नामजप** २५
३ अ. वाईट शक्तींचा त्रास असलेल्यांनी करायचे नामजप २५
३ आ. वाईट शक्तींचा त्रास नसलेल्यांनी करायचे नामजप २७
**प्रकरण ४. साधनेच्या पुढच्या अवस्थेत असलेल्यांनी करायचे नामजप** २८
४ अ. वाईट शक्तींचा त्रास असलेल्यांनी करायचे नामजप २८
४ आ. वाईट शक्तींचा त्रास नसलेल्यांनी करायचे नामजप ३०
**प्रकरण ५. नामजपाचे अन्य काही प्रकार** ३२
५ अ. ईश्वराच्या निर्गुण रूपाचा वाचक ‘ॐ’ याचा जप ३२
५ आ. उद्देशानुसार नामजप करणे ५ इ. सांप्रदायिक नामजप ३४
५ ई. काही पंथांतील नामजप ४८
५ उ. प्रांत आणि भाषा यांनुसार नामजप ४९
५ ऊ. काही संत, मुनी आणि भक्त करत असलेले नामजप ५०
५ ए. स्वप्नात (स्वप्नदृष्टांत होऊन) मिळालेला नामजप ५०
**प्रकरण ६. विविध नामजपांचे परिणाम आणि त्या नामजपांची परमेश्वराशी एकरूप करण्याची क्षमता** ५१
६ अ. काही देवतांच्या नामांचे परिणाम ५१
६ आ. नामाच्या अर्थानुसार होणारे परिणाम ५६
६ इ. निरनिराळ्या नामांचे निरनिराळ्या देहांच्या स्पंदनसंख्येशी जुळणे आणि त्यांची परमेश्वराशी एकरूप करण्याची क्षमता ५७
**प्रकरण ७. नामजपाविषयी शंकानिरसन** ५८
卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ६०

# मनोगत

‘कलियुगात ईश्वरप्राप्ती करून घेण्यासाठी नामजप हे सर्वोत्तम साधन आहे’, असे अनेक संतांनी सांगितले आहे. काही जण काही वर्षे प्रयत्नपूर्वक नामजप करतात. असे करूनही अनुभूती न आल्यास त्यांना वाटते, ‘नामात काही अर्थ नाही.’ मग त्यांचा अध्यात्मावरचा विश्वास उडतो. त्यांना हे कळत नाही की, त्या नामजपात दोष नाही, तर आपण निवडलेला नामजप स्वतःच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी योग्य नाही; म्हणून त्या नामजपाची प्रचीती येत नाही.

‘गुरु किंवा अध्यात्मातील अधिकारी व्यक्ती आपल्या जीवनात आली नाही, तर नेमके योग्य असे कोणते नाम घ्यावे ?’, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडणे साहजिक आहे. त्यांना या ग्रंथाद्वारे मार्गदर्शन मिळेल. जिज्ञासू आणि नामजप-साधनेला आरंभ करू इच्छिणारे यांनी करायच्या नामजपाविषयी या ग्रंथात सांगितले आहे.

‘वाईट शक्ती’ म्हणजे त्रासदायक सूक्ष्म-देह (लिंगदेह). कालमाहात्म्यानुसार सध्याच्या सूक्ष्मातील संकटकाळात वाईट शक्तींच्या त्रासांचे प्रमाण पुष्कळ वाढले आहे. जवळजवळ प्रत्येक मनुष्यालाच अल्प-अधिक प्रमाणात वाईट शक्तींचे त्रास होत आहेत. त्या त्रासांमुळे मनुष्याचे जीवन समस्यामय आणि दुःखी तर बनतेच, तसेच त्याची साधनाही नीट होत नाही. यास्तव ‘वाईट शक्तींच्या त्रासांच्या निवारणासाठी कोणता नामजप करायचा ?’, याचेही मार्गदर्शन या ग्रंथात केले आहे.

शाळेत जसे पुढच्या पुढच्या इयत्तेत पुढचा पुढचा अभ्यास करावा लागतो, तसे नामजप-साधनेच्या पुढच्या पुढच्या अवस्थांतही निरनिराळे नामजप करावे लागू शकतात. यामुळे साधकाची साधना चांगली होऊन त्याची आध्यात्मिक प्रगती लवकर होण्यासही साहाय्य होते. यासंदर्भातही प्रस्तुत ग्रंथ बहुमोल मार्गदर्शन करतो.

या व्यतिरिक्त या ग्रंथात नामजपाचे अन्य काही प्रकार, उदा. 'ॐ'चा नामजप करणे, इच्छापूर्ती करणाऱ्या देवतेचा नामजप करणे, इंद्रियांचे कार्य सुधारण्यासाठी इंद्रियांच्या देवतांचा नामजप करणे, तसेच सांप्रदायिक नामजपाच्या मर्यादा, नामजपांचे होणारे परिणाम इत्यादी माहितीही दिली आहे.

'हा ग्रंथ वाचून आवश्यक तो नामजप करून सर्वांनी शीघ्र आध्यात्मिक उन्नती करून घ्यावी', ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक** F (PR 9-2)

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाधीविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले, तरी त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी 'प.पू.' किंवा 'परात्पर गुरु' अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या उत्तराधिकाऱ्यांच्या उपाध्यांविषयीचे विवेचन !

जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना 'श्रीसत्‌शक्ति' आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना 'श्रीचित्‌शक्ति' या उपाध्यांनी संबोधले जात आहे. त्यामुळे त्यापूर्वीच्या लिखाणात त्यांच्या नावाच्या आरंभी 'श्रीसत्‌शक्ति' किंवा 'श्रीचित्‌शक्ति' ही उपाधी लावलेली नाही. F (DrUtt + SStAG-Nav + SStBS-Nav)